## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कणकवली यांचे कार्यालय,

तालुका-कणकवली,जि-सिंधुदुर्ग-416602 दुरध्वनी व फॅक्स क्रमांक-02367-232025
संकेत स्थळ-www.tahsildarkankavli.orgईमेल-tkantah.si-mh@nic.in

क्रमांक:फौजदारी/रा.से.पू/परिक्षा-10/2020 दिनांक- 06/10/2020

वाचले - १) फौजदारी प्रक्रीया संहीता १९७३ चे कलम १४४ नुसार आदेश
३) मा.जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचेकडील पत्र क्रमांक: आस्था/MPSC/कावि-105/2020 दि.30.09.2020

आदेश -

ज्याअर्थी महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई यांचे मार्फत घेण्यात येणारी राज्य सेवा पूर्व परीक्षा 2020 ही रविवार दिनांक 11 ऑक्टोबर 2020 रोजी सकाळी 10.00 ते 12.00 व दुपारी 3.00 ते 500 या वेळेत 1.विदयामंदीर माध्यमिक प्रशाला कणकवली 2.कणकवली कॉलेज कणकवली 3.एस.एम.हायस्कूल कणकवली या उपकेंद्रावर घेण्यात येणार आहे. आणि ज्याअर्थी ही परीक्षा सुस्थितीत नियोजनबध्द तसेच चोख पार पाडण्यासाठी या परीक्षा केंद्रांच्या सभोवर २०० मी. परीसरात फौजदारी प्रक्रीया संहीता १९७३ चे कलम १४४ नुसार प्रतिबंधात्मक आदेश लागू केल्याशिवाय या परीक्षेचे काम सुस्थितीत नियोजनबध्द तसेच चोख पार पाडता येणार नाही अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी **रमेश पवार कार्यकारी दंडाधिकारी,** कणकवली फौजदारी प्रक्रीया संहीता १९७३चे कलम १४४ नुसार मला प्राप्त झालेल्या आदेशाचा वापर करुन रविवार दि. **11 ऑक्टोंबर 2020 रोजी सकाळी 10.00 ते 12.00 व दुपारी 3.00 ते 500 वाजेपर्यंत या परीक्षेचे केंद्र 1.विदयामंदीर माध्यमिक प्रशाला कणकवली 2.कणकवली कॉलेज कणकवली 3.एस.एम.हायस्कूल कणकवली** या उपकेंद्राच्या सभोवर २०० मी. परीसरात खालील कृत्ये करण्यास मनाई करीत आहे.

1) परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधित असलेले अधिकारी व कर्मचारी या व्यतिरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस या परीसरात प्रवेश करता येणार नाही.
2) परीक्षा केंद्र व त्या सभोवतालच्या २०० मीटर परीसरातील सर्व झेरॉक्स केंद्र चालू ठेवण्यास या व्दारे प्रतिबंध करणेत येत आहे.
3) परीक्षा केंद्र व त्या सभोवतालच्या २०० मीटर परीसरामध्ये फॅक्स, इमेल व इंटरनेट सुविधा व इतर कोणत्याही संभाषणाच्या अगर कोणत्याही पत्रव्यवहाराच्या सुविधांचा वापर करता येणार नाही.
4) परीक्षा केंद्र व त्या सभोवतालच्या २०० मीटर परीसरातील सर्व सार्वजनिक टेलिफोन, एसटीडी आयएसडी, ध्वनीक्षेपक चालू ठेवण्यास प्रतिबंध करणेत येत आहे.

वरील आदेशाचे जो कोणी उल्लंघन करील तो भारतीय दंड संहिता कलम १८८ मधील तरतुदीनुसार होणा-या शिक्षेस पात्र राहील. हा आदेश आज दिनांक 06/10/2020 रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी देण्यात आला.

सही/-
कार्यकारी दंडाधिकारी,
कणकवली

प्रत-
१) मा.जिल्हादंडाधिकारी सिंधुदुर्ग यांजकडे माहीतीसाठी सविनय सादर
२) मा. उपविभागीय दंडाधिकारी कणकवली यांजकडे माहीतीसाठी सविनय सादर
३) मा. उपविभागीय पोलीस अधिकारी कणकवली यांजकडे आवश्यक माहीती व उचित कार्यवाहीसाठी
४) पोलीस निरीक्षक कणकवली यांचेकडे आवश्यक व उचित कार्यवाहीसाठी रवाना
२/- प्रत्येक परीक्षाकेंद्रावर आवश्यक व पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवणेत यावा.
५)विदयामंदीर माध्यमिक प्रशाला कणकवली,ता.कणकवली यांना माहीतीस्तव
६.) कणकवली कॉलेज कणकवली ता.कणकवली यांना माहीतीस्तव
७)एस.एम.हायस्कूल कणकवली ता.कणकवली यांना माहीतीस्तव

कार्यकारी दंडाधिकारी
कणकवली

दा.ता.
06/10/2020

| आ.क्र. | |
|---|---|
| दा.ता. | 08/10/2020 |
| पो.नि.स्वा. | |
| कार्यानि/पोउनि | |